कोर्ट

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईदर, वसई-विरार **P.S.(ठाणे):** पेल्हार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0217 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/03/2023 02:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(१)(अ) |
| 4 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | १३(२) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 04/03/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/03/2023
   **Time From (वेळेपासून):** 12:27 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/03/2023 **Time (वेळ):** 19:02 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/03/2023 02:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुंबई अहमदाबाद हायवेवरील,पेल्हार येथील रिलायंस पेट्रोल, पंपासमोरील रोडवर कारमध्ये,पेल्हार ता वसई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मुजीब मैनोद्दीन खान

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं4,बाबा कंम्पाउंड, पेल्हार,तावसई जिपालघर,पेल्हार,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं4,बाबा कंम्पाउंड, पेल्हार,तावसई जिपालघर,पेल्हार,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9975058750

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रणजित दिनकर डोळे | | | 1. रूम नं103,शुभारंभ पार्क, शेलार,भिवंडी, ताभिंवडी, जिठाणे,पेल्हार,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/रू. | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक: 04/03/2023

मी श्री.मुजीब मैनोद्दीन खान, वय 34 वर्षे, रा.घर नं.4, बाबा कंम्पाउंड, पेल्हार, ता.वसई जि.पालघर मोबाईल क्र. 9975058750 समक्ष फिर्याद लिहुन देतो की,

मी वरिल पत्यावर माझे परीवारासह राहत असून माझे मौजे पेल्हार ता.वसई येथील सर्वे नं.281 (अ) /23 या माझ्या भावाच्या मालकीच्या जागेमध्ये राहते घर होते. सदरचे घर हे दिनांक 22/11/2022 रोजी वन विभाग मांडवी कार्यालयाकडून तोडण्यात आले होते. याकारणास्तव माझे मांडवी येथील फाॅरेस्ट कार्यालयात येणे जाणे होत होते. त्यावेळी सदर कार्यालयातील वनरक्षक रणजित डोळे हे माझे संपर्कात येवून त्यांची व माझी ओळख झाली. त्यानंतर त्यांनी माझेशी संपर्क साधुन त्यांनी मला घर बांधण्यासाठी दुसरी जागा देतो, तुम्ही त्यावर घराचे बांधकाम करा असे सांगितले. व त्यांनी मला गाव मौजे तिल्हेर येथील सर्वे नं.256/27 ही जागा दाखवून सदरची जागा कमी किंमतीमध्ये मिळेल असे सांगितले. त्यावर मी श्री.डोळे यांना सदर जागेवर घर बांधल्यास पुन्हा तुम्ही माझे घर तोडाल असे सांगितले त्यावेळी त्यांनी मला सदरची जागा ही श्री.हरिभाऊ भुयाळ व इतर यांच्या मालकीची असून सदरची जमिन आदीवासी कुटुंबाच्या सामाईक मालकीची आहे. त्यामुळे जमिनीचे मालक श्री.भुयाळ यांना 9 लाख रूपये दयावे लागतील तसेच सदर जमिनीवर बांधकाम केल्यास त्यावर वन विभागाकडून कारवाई होणार नाही याची जबाबदारी मी घेईन परंतू त्याबदल्यात मला 2,00,000/-रू. दयावे लागतील असे सांगुन माझ्याकडे 2,00,000 /- रू. लाचेची मागणी केली. परंतू मला श्री.रणजित दिनकर डोळे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक 03/03/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयात जावून श्री.स्वपन बिश्वास, पोलीस निरीक्षक यांची भेट घेवून त्यांना वरीलप्रमाणे हकिगत सांगून माझे स्वहस्ताक्षरातील श्री.रणजित डोळे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी यांचेविरूध्द लेखी तक्रार दिलेली होती.

मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी पोलीस निरीक्षक श्री.स्वपन बिश्वास यांनी दिनांक 04/03/2023 रोजी मुंबई अहमदाबाद हायवे रोडवरील विरार फाटा येथील उड्डाणपुलाच्या खाली माझी भेट घेवून दोन पंचाशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर त्यांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकीगत समजावून सांगून पोलीस निरीक्षक श्री. स्वपन बिश्वास यांनी लोकसेवक श्री.रणजित दिनकर डोळे, वनरक्षक यांचे कार्यालयात जावून त्यांच्याकडे माझे कामाचे अनुषंगाने मला दाखविलेल्या जागेसंदर्भात जमिनीचे मालक श्री.भुयाळ यांना 9 लाख रूपये देणेसाठी व सदर जमिनीवर बांधकाम केल्यास त्यावर वन विभागाकडून कारवाई न होण्यासाठी लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पंचासमक्ष पडताळणी करण्याचे ठरविले.

तसेच आज दिनांक 04/03/2023 रोजी सकाळपासून मला श्री.रणजित डोळे यांचे वारंवार फोन येत होते त्यामुळे मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्री.रणजित डोळे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्यापुर्वी नेमके कोणत्या ठिकाणी भेटण्याचे आहे ती जागा निश्चित करण्यासाठी त्यांना भेटण्यास जाण्यापुर्वी फोन करून जाणे गरजेचे असल्यामुळे दिनांक 04/03/2023 रोजी सर्व कायदेशीर कारवाई करून माझे मोबाईलवरून श्री.रणजित डोळे यांना फोन केला त्यावेळी मी त्यांना भेटण्यासाठी घरातून निघाल्याचे सांगून माझे मेव्हण्यांना जागा बघून काय ते फायनल करतील असे सांगितले असता श्री.रणजित डोळे यांनी मला व्हाॅटसअॅप काॅल करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांना व्हाॅट्स अॅप काॅल केला त्यावेळी त्यांनी कसे काय करायचे असे बोलले त्यावेळी मी माझ्या मेव्हुण्यांना जागा दाखवून ते काय म्हणतात ते बघुया असे बोललो. त्यावर श्री. रणजित डोळे मला टोकन घेवून येण्यास सांगून तसेच मेव्हुण्यांना विचारून काय ते फायनल सांगा असे बोलले त्याला



Scanned with CamScanner

मी ठिक आहे मी विचारून पुन्हा फोन करतो असे म्हणून फोन ठेवला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी सांगितल्याप्रमाणे पंच नं.01 यांना माझे मेव्हुणे म्हणून श्री.रणजित डोळे यांचे समोर घेवून जाण्याचे ठरले त्याप्रमाणे मी पुन्हा माझे मोबाईलवरून श्री.रणजित डोळे यांना फोन केला आणि मेव्हण्यांशी बोलणे झाले असून ते समोर येवून बोलणार आहेत असे सांगीतले असता श्री.रणजित डोळे यांनी त्यांना माझे मेव्हण्यांशी बोलायचे असल्याने त्यांचेकडे फोन दया असे सांगीतले. त्याप्रमाणे मी पंच नं.01 यांचेकडे फोन दिला असता पंच नं.01 हे त्यांचेषी माझे मेव्हुणे म्हणून बोलले. त्यावेळी श्री.रणजित डोळे यांनी त्यांना तुम्ही पेपर बधीतलेत ना, त्यात तुम्हाला काय प्राॅब्लेम वाटतो का? असे विचारले त्यावर पंच नं.01 यांनी ठिक आहे काय प्राॅब्लेम नाही असे सांगीतले असता श्री.रणजित डोळे यांनी जागेवरच टोकन घेवून येण्यास सांगीतले. त्यावर मी किती घेवून येवू असे विचारले असता, त्यांनी एक दिड लाख रूपये घेवून जागेवर या असे सांगून ते अर्ध्या तासात जागेवर येतील असे सांगीतले व फोन ठेवला. लोकसेवक यांनी मला जागेवर भेटण्यासाठी बोलाविले असल्यामुळे माझे अंगावर व्हाॅईस रेकाॅर्डर लावून मला पंच नं.01 यांचेसह माझेकडील चारचाकी वाहनाने श्री.रणजित डोळे यांनी सांगीतल्याप्रमाणे मौजे तिल्हेर येथील जागेवर गेलो. त्यावेळी श्री.रणजित डोळे हे सदर ठिकाणी आधीच आलेले होते. त्यांच्याशी मी पंच नं.01 यांची माझे मेव्हणे म्हणून ओळख करून दिली. त्यावेळी श्री.रणजित डोळे यांनी पंच नं.01 यांना जागेच्या बाबतीत माहीती देवून एखादया वर्षात नोटीफिकेशन निघाले तर जागा पण तुमच्या नावावर होवून जाईल असे सांगीतले. त्यावर मी त्यांना तेथे घर बांधण्यासाठी वगैरे कसे करायचे असे विचारले असता, त्यांनी ''आमचे साहेब वगेरे म्हणजे आमचे जे पण काय असेल ते पाच-पन्नास हजार रूपये खर्च येईल तुमचं तुटनार नाही याची गॅरंटी माझी असे बोलले त्यावर मी पैसे कशासाठी दयावे लागतील असे विचारले असता, त्यांनी तुमचे काय होतयं ना, तुम्हाला काय टेन्शन आहे का? असे सांगून बांधताना अजिबात काही त्रास होणार नाही असे सांगीतले. त्यानंतर सदर जागेच्या एका गुंठयाचे दिड लाख रूपये प्रमाणे सहा गुंठयाचे नऊ लाख रूपये होतील असे बोलले. त्यानंतर आंम्ही अर्ध्या तासात येतो असे सांगून तेथून निघालो त्यावेळी श्री.रणजित डोळे यांनी ते आमचे घरी येवून घरच्यांना समजावून सांगतो असे बोलले. त्यावर मी त्यांना त्याची काही गरज नाही असे सांगून निघालो असता श्री. रणजित डोळे हे आमचे सोबत कारमध्ये आले. तेव्हा मी पडताळणी पथकाकडे परत जात असल्याने त्यांना एका हाॅटेलवर थांबण्यासाठी जेवणाचा बहाणा करून उतरविले व मी पडताळणी पथकाजवळ गेलो.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी माझेकडील व्हाॅईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये श्री.रणजित डोळे यांनी माझेकडे माझे कामाचे अनुषंगाने ''आमचे साहेब वगेरे म्हणजे आमचे जे पण काय असेल ते पाच-पन्नास हजार रूपये खर्च येईल तुमचं तुटनार नाही याची गॅरंटी माझी'' असे म्हणून 50,000/- रू लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याचे तसेच मी अर्ध्या तासात येतो असे सांगीतले असल्याने लागलीच सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी मला लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, माझ्याकडे फक्त 20,000/- रू उपलब्ध असल्याचे त्यांना सांगितले. त्यामुळे उपलब्ध असलेल्या रक्कमेवर सापळापुर्व पंचनाम्याची कायदेशीर कारवाई चालू असतानाच श्री.रणजित डोळे हे मला वारंवार फोन करून लाचेची रक्कम घेवून येण्यासाठी मुंबई अहमदाबाद हायवेवरील पेल्हार येथील रिलायंस पेट्रोल पंपावर वाट पाहत असल्याचे सांगत होते. त्यामुळे सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण झाल्यानंतर मी सदरच्या लाचेच्या रक्कमेसह व्हाॅईस रेकाॅर्डर लावून पंच नं. 1 यांच्यासोबत लोकसेवक श्री.रणजित डोळे हे वाट पाहत असलेल्या मुंबई अहमदाबाद हायवेवरील पेल्हार येथील रिलायंस पेट्रोल पंपासमोरील रोडवर माझ्याजवळील गाडी थांबविली असता श्री.रणजित डोळे हे माझे गाडीमध्ये येवून बसले. त्यावेळी सर्व सापळा पथक माझे गाडीचे आजूबाजुला थांबून माझेवर लक्ष ठेवून होते. त्यानंतर श्री.रणजित डोळे यांनी मला पैसे आणण्यासाठी जास्त वेळ का लागला तसेच माझे फोन उचलले का नाही याबाबत विचारणा केली तसेच माझे कामाचे अनुषंगाने बोलणी केल्यानंतर मी लाचेची रक्कम श्री.रणजित डोळे यांच्या समोर धरून फक्त 20,000/-रूपये असल्याचे सांगितले त्यावेळी श्री.रणजित डोळे यांनी एवढयात काही होणार नसल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना सध्या 20,000/-रू. घेणेबाबत व उर्वरित राहिलेली रक्कम ही सोमवारी देतो असे सांगितले असता श्री.रणजित डोळे यांनी माझेकडील उपलब्ध लाचेची रक्कम 20,000/- रूपये स्विकारून त्यांचेकडील गुलाबी रंगाच्या प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये ठेवली त्यावेळी मी माझे गाडीची पार्किंग लाईट लावून श्री. रणजित डोळे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत सापळा पथकास इशारा केला असता पोलीस निरीक्षक श्री. बिश्वास, पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप व सापळा पथकाने माझे गाडीजवळ येवून लोकसेवक श्री.रणजित डोळे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. तसा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी लोकसेवक श्री.रणजित दिनकर डोळे, वय 25 वर्षे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी, (वर्ग-3) रा.रूम नं. 103, शुभारंभ पार्क, शेलार, भिवंडी, ता.भिवंडी, जि.ठाणे हे आदीवासी/भुमीहिनांना वाटप झालेल्या वन जमिनी



Scanned with CamScanner

इतर कोणालाही शासनाच्या परवानगीशिवाय विकता किंवा हस्तांतरीत करता येत नाही किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येत नाही हे माहित असूनही स्वतःचे शासकिय पदाचे व अधिकाराचे दुरूपयोग करून जमिनीचे मालक श्री.भुयाळ यांना 9 लाख रूपये देणेसाठी व सदर जमिनीवर बांधकाम केल्यास त्यावर वन विभागाकडून कारवाई न होण्यासाठी 50,000/- रूपयेची स्वतःसाठी व त्यांचे वरिष्ठांसाठी लाचेची मागणी करून त्यापैकी 20,000/- रू. लाचेची रक्कम दिनांक 04/03/2023 रोजी दुपारी 15:40 वाजताचे सुमारास मुंबई अहमदाबाद हायवेवरील पेल्हार येथील रिलायंस पेट्रोल पंपासमोरील रोडवर कारमध्ये स्विकारली असताना लोकसेवक श्री.रणजित दिनकर डोळे, वय 25 वर्षे, वनरक्षक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर कार्यालयाचे सापळा पथकाने रंगेहात पकडले आहे म्हणून माझी लोकसेवक श्री.रणजित दिनकर डोळे, वय 25 वर्शे, वनरक्षक, वनपरिक्षेत्र कार्यालय मांडवी, (वर्ग-3) यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद लिहून दिली.

(स्वपन बिश्वास) ( मुजीब मैनोद्दीन खान )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
पालघर
**District (जिल्हा):** पालघर
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15 Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठविल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमंलदार

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Vasant Chandrakant

Rank(पद): I (Inspector)

No.(क्र.): PNMAH



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**



Scanned with CamScanner